## विभाग III (तीन)

## देवाची दैवी हजेरी , भक्ती व प्रार्थनेमध्ये

**देवाचे चिलखत परिधान करणे**

*हि प्रार्थना करणे हा तुमच्या रोजच्या परीपाठाचा भाग बनवा. हि प्रार्थना तुमची प्रत्येक दिवसाच्या अध्यात्मिक आव्हानाचा देवाची शक्ती व सामर्थ्याने तुम्हाला सामना करण्यासाठी तयार करेल.*

प्रिय देवबाप्पा (अधिपती) आज जेव्हा मी बिछाण्यातून उठले तेव्हा मला ठाऊक आहे कि मी रणभूमीवर पाउल टाकत आहे. मला हेही ठाऊक आहे कि मी खंबीरपणे उभे राहावे. यासाठी लागणारे सर्व काही तू मला दिले आहेस. म्हणून तुझ्या पवित्र आत्म्याच्या शक्तीने मी देवाचे चिलखत घालत आहे.

प्रथम मी मुक्तीचे शिरस्त्राण डोक्यावर घालते. कृपा करून माझे अंतःकरण आणि विचार यांचे संरक्षण कर. माझे नेत्र सांभाळ. कोणत्याही पापाने त्यातून गुपचूप येऊ नये. कृपा करून माझे विचार फक्त देवाच्या गोष्टींवर केंद्रित होतील असे कर. छातीच्या संरक्षणासाठी असलेल्या कवचाने माझे अंतःकरण व भावना सुरक्षित राहू दे. मी प्रार्थना करते कि भावनांचा माझ्यावर अधिकार चालू देऊ नकोस. तर फक्त सत्याने तुझा शब्द/ वचन माझ्यासाठी माझ्याभोवती कमरपट्ट्यासारखे होऊ दे. चुकांपासून माझं बचाव कर. माझी पावले योग्य रीतीने पडवीत म्हणून मी शांतीचे जोडे घालते व तू मला मार्गदर्शन कर. तुझ्या सत्यामध्ये माझी पावलं रुजावीत असं कर. आघाताविरुद्ध खंबीर रीतीने उभे राहण्यास मला शक्ती दे.

पुढे मी विश्वासाची ढाल घेते. देवा कृपा करून सैतानाच्या भयानक वाणीपासून माझे रक्षण कर.

सैतानाच्या सर्व योजनांचा प्रतिकार करण्यासाठी मला तुझ्या सैन्याबरोबर खांद्याला खांदा लाऊन उभं राहावे असे ठेव. शेवटी मी आत्म्याची तलवार घेते. तुझा पवित्र शब्द. देवा कृपा करून तुझे शास्त्र पुन्हा नवीन पाने वाचण्यासाठी माझी मदत कर. खळबळ माजवणारे मार्ग दे म्हणजे मी सदैव हल्ल्यामधून सुरक्षित मार्ग काढू शकेन. तुझे सत्य इतरांबरोबर वाटून घेऊ शकेन. मला माहिती आहे कि माझ्यावर भयंकर हल्ले होतील. देवा, तु मला खंबीरपणे उभे राहण्यास शक्ती दिलेली आहेस. देवा कृपा करून आजची लढाई लढण्यास मला शक्ती दे. परमेश्वराचा आनंद माझी ताकद आहे. ख्रिस्ताच्या नावाने हि प्रार्थना करते. आमेन

**पवित्र शास्त्रातील संदर्भ :- (इफिसकरांस पत्र ६:१३ - १६)**

येशु ने शिकवलेली प्रार्थना
हे आमच्या स्वर्गातील पित्य
तुझे नाव पवित्र मानले जाओ
तुझे राज्य येवो
जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही
तुझ्या इच्छेप्रमाणे होवो
आमची रोजची भाकर आज आम्हास दे
आम्हाला आमच्या पापांबद्दल क्षमा कर
आम्ही आमच्याशी वाईट वागलेल्यांना क्षमा करू
आम्हाला मोहापासून दूर ने
आणि वाईटा पासून सोडव
कारण कि राज्य सामर्थ्य आणि गौरव
हे सर्वकाळ तुझीच आहेत
आमेन
शास्त्र संदर्भ (मत्तय ६:९-१३)

**<u>परमेश्वराच्या संरक्षणाची प्रार्थना</u>**

जो परात्पराच्या गुप्त स्थळी बसतो
तो सर्व सामर्थ्याच्या सावलीत राहील
मी परमेश्वराला म्हणतो तू माझा आश्रय तू माझा दुर्ग
तू माझा देव. तुजवर मी भाव ठेवितो,
कारण तो पारध्याच्या पाशापासून
आणि घटक रोगांपासून माझा बचाव करेल
तो तुजवर पाखर घालील
त्याच्या पंखाखाली तुला आश्रय मिळेल
त्याचे सत्य ढाल व कवच आहे
रात्रीच्या सामयीचे भय
दिवसा सुटणारा बाण
काळोखात फिरणारी मरी
भर दोन प्रहरी नाश करणारी पटकी
यांची तुला भीती वाटणार नाही
तुझ्या बाजूस सहस्रावधी पडले
तुझ्या उजव्या बाजूस लक्षावधी पडले

तरी ती तुला भिडणार नाही
मात्र तुझ्या डोळ्यास ती दिसेल आणि
दुर्जनास प्राप्त होणारे प्रतिफळ तुझ्या दृष्टीस पडेल
कारण परमेश्वर माझा आश्रय आहे असे म्हणून
तू परत्पराला निजधाम केले आहेस.
यास्तव कोणतेही अरिष्ट तुझ्यावर येणार नाही.
कोणतीही व्याधी तुझ्या तंबू जवळ येणार नाही
कारण तुझ्या सर्व मार्गात तुझे रक्षण करण्याची
तो आपल्या दिव्यदूतास आज्ञा देईल
तुझ्या पायांना धोंड्याची ठेच लागू नये
म्हणून ते तुला आपल्या हातांवर झेलून धरतील
तू सिंह व नाग यावर पाय देऊन चालशील
तरुण सिंह व अजगर यांस तुडवीत चालशील
त्याचे प्रेम मजवर आहे
म्हणून मी त्याला मुक्त करेन
त्याला माझ्या नामाची जाणीव आहे
म्हणून मी त्याला उच्च स्थळी निर्भय ठेवीन
तो माझा धावा करेल आणि मी त्याचे ऐकेन
संकट समयी मी त्याची जवळ असेन
मी त्याला मुक्त करेन, मी त्याचा गौरव करेन
त्याला दीर्घायुष्य देऊन तृप्त करेन
त्याला मी सिद्ध केलेल्या तारणाचा अनुभव घडविन

शास्त्र संदर्भ (स्त्रोत्र ९१)

**<u>परमेश्वर आपल्याला पुरवठा करणारा आहे.</u>**
**(तो आपल्या सर्व गरजांची काळजी घेतो)**
परमेश्वर माझा मेंढपाळ आहे
मला काहीही उणे पडणार नाही
तो मला हिरव्यागार कुरणात बसवतो
तो मला शांत पाण्याजवळ नेतो
तो माझा जीव ताजातवाना करतो
तो आपल्या नामास्तव मला नितीमार्गाने चालवितो
मृत्युछायेच्या दरीतून जरी मी जात असलो
तरी अरिष्टास भिणार नाही
कारण तू माझ्याबरोबर आहेस

तुझी आकडी व तुझी काठी मला धीर देतात
तू माझ्या शत्रूंच्या देखत मजपुढे ताट वाढ्तोस
तू माझ्या डोक्याला तेलाचा अभंग करतोस
माझे पात्र काठोकाठ भरले आहे
खरोखर माझ्या आयुष्याचे सर्व दिवस
मला कल्याण व दयाही लाभतील
आणि परमेश्वराच्या घरात मी चिरकाल राहीन

शास्त्र संदर्भ (स्त्रोत्र २३)

**<u>तीन वाजेची प्रार्थना</u>**

तू मरण पावलास देवा परंतु जीवनाचे उगमस्थान जोराने आत्म्यासाठी उफाळत बाहेर आले.
करुणेचा सागर सर्व विश्वासासाठी उघडला गेला
जीवनाचा शर, खोल दैवी करुणा ह्या सर्व जगाला लपेटून घे/ आच्छादून टाक आम्हावर तुझे सर्वस्व रिते कर
हे रक्त व पाणी
जे येशूच्या हृदयातून जोराने उफाळत बाहेर आले
करुणेचा झरा, मी तुझ्यावर विश्वास ठेवते,
पवित्र देवा, पवित्र पराक्रमी, पवित्र अमर्त्य, आम्हावर व सर्व जगावर दया कर
राजा प्रभो, करुणेच्या राजा, आम्ही तुझ्यावर विश्वास ठेवतो

आमेन

**<u>परमेश्वराचे मार्गदर्शन शोधणे</u>**

देव, मला जे निर्णय घ्यायचे आहेत त्यासाठी मी तुझे मार्गदर्शन शोधत आहे. मी माझ्या जीवनासाठी तुझी इच्छा शोधत आहे. मी माझ्या पूर्ण अंतःकरणाने तुझ्यावर विश्वास ठेवतो. मी माझ्या स्वतःच्या आकलन शक्तीवर अवलंबून राहत नाही. मी जे काही करते त्या मध्ये तुझी इच्छा शोधते आणि देवा मला हे माहिती आहे कि कोणता मार्ग निवडावा.

देवा तुझ्या दैवी अस्तित्वात/ हजेरीत स्थिर राहावे हे शिकव. मी तुझा सौम्य शांत आवाज कसा ऐकू शकेन हे शिकव. मला आशीर्वाद दे कि तुझ्याशी व तुझ्या सूचनांप्रमाणे आज्ञाधारक राहून चालावे. देवा तुझे वचन, तुझी इच्छा मला मान्य असू दे. पित्य, येशूच्या नावाने मी प्रार्थना करते. आमेन

शास्त्र संदर्भ (नितीसुत्रे ३:५-६)

**<u>मानसिक अस्वस्थता ताण आणि काळजी यावर मात करण्यासाठी प्रार्थना</u>**

सर्व समर्थ देवा, मी तुझ्याकडे माझी प्रार्थना घेऊन आले आहे. तुला कल्पना आहे मी कोणत्या परिस्थितीतून जात आहे. मला काळजी वाटते व मी तणावाखाली आहे. देवा मला कल्पना आहे कि मी काळजी करत असले आणि तणावाखाली असले तर माझे प्रश्न सुटणार नाहीत आणि मला माहिती आहे कि तू सर्व समर्थ देव आहेस. शक्तिशाली व प्रेमळ. देवा मी तुझ्या कडे तुझे आशीर्वाद मागण्यास आले आहे. देवा मला माहिती आहे तू तुझ्या

बालकांना तुझ्या कडे बोलावतोस. माझ्यासारख्यांना सुद्धा जी थकलेली व ज्यांच्याकडे मोठे ओझे आहे. तू मला वचन दिले आहेस कि मी सर्व तुझ्यावर सोडावे. मी माझी सर्व चिंता व काळजी तुझ्या कडे देत आहे. कारण तू माझ्यावर माया करतोस, तुला धन्यवाद येशु, तुझे आभार मानते. तू अंतःकरणाचा सौम्य व नम्र आहेस. मला तुझ्यामध्ये विश्रांती मिळेल. प्रार्थनेमध्ये मी तुझी सर्व बालके जी माझ्यासारख्या कठीण प्रसंगातून जात आहेत. त्यांच्यासाठी प्रार्थना करते. तुझ्या शांती ने आम्हाला आशीर्वादित कर. पित्या, येशूच्या सामर्थ्यशाली नावात हि प्रार्थना करते.

आमेन

(शास्त्र संदर्भ ११:२८-३०, १ले पेत्र ५-७)

**<u>निरोगी करण्यासाठी प्रार्थना</u>**

सर्व समर्थ देवा, तू पवित्र आणि सदाचरणी आहेस, तू शक्तिशाली आणि कनवाळू आहेस. वर आकाशात आणि खाली पृथ्वीवर केवळ तुझेच अधिपत्य आहे. प्रेमळ देवा, तू ईश्वरी कृपेचा देव आहेस. तू आम्हाला सर्वांना जीवन दिलेस. तू आमचा रक्षणकर्ता आहेस. आमचे आजार, रोग व चिंता बरे करण्याचे अधिकार तुझ्या बरे करण्याच्या ताकदीमध्ये आहे.

तू खूप प्रेमळ व कनवाळू आहेस. तू तुझा प्रिय पुत्र आम्हाला आमचा रक्षणकर्ता म्हणून दिलास. आमची सर्व पापे, आजार क्रुसावर धुवून गेलेत. केवळ ख्रिस्ताला बसलेल्या फटक्यांमुळे (ज्यात बरे करण्याची ताकद होती) व त्याच्या पवित्र रक्तामुळे आम्ही बरे केले गेलोत.

देवा माझं उणेपणा माझी पापे तुझ्यासमोर मी कबूल करते. देवा, तुझ्या शिवाय मी काहीच नाही. केवळ तुझ्या मोहकते मुळे मी बरी केली गेलेली आहे. तू सर्व चमत्कारांचा देव आहेस. तुझ्या प्रेमळ व कनवाळू शक्ती मध्ये मी विश्वास ठेवते. तू मला क्षमा केली आहेस व बरे केले आहेस. हे देवा मला शुद्ध अंतःकरण व नवीन ह्रदय दिल्याबद्दल मी तुझे आभार मानते, तुझी शांती मला दिल्याबद्दल मी तुझे आभार मानते. कृपा करून माझ्याबरोबर सतत राहा. तू (इम्यनुएल)आम्हाबरोबर देव आहेस.

तू मार्ग सत्य आणि जीवन आहेस. तू माझ्या जीवनाचा प्रकाश आहेस. माझ्यावरील तुझ्या प्रेमामुळे मी वाचविले गेले आहे. तुझ्या मौल्यवान आणि पवित्र रक्ताने हे देवा मला लपेटून घे.

येशु, मला तुझ्या आणखी समीप घे. मी तुझ्या बलवान शक्ती मध्ये विश्वास ठेवते. तू माझा तारणकर्ता, बरे करणारा, संरक्षक आणि आश्रय आहेस. तू माझा देव आहेस.

देवबाप्पा, तू माझ्याबद्दल सर्व जाणतोस, माझ्या गरजा व इच्छा. तुझ्या बलशाली हातात मी स्वतःला ताब्यात देते. हे सर्व माझ्यासाठी तुझ्या इच्छेप्रमाणे होवो. मी तुझी आहे. मी वाचवलेली व बरी केलेली आहे.

पित्या, माझे भाऊ व बहिणी ज्यांना तुझ्या कृपा व आशीर्वादाची गरज आहे, त्यांच्या साठी प्रार्थना करते. माझ्या सर्व प्रार्थना ख्रिस्ताच्या सामर्थ्यवान नावात मागते. आमेन

शास्त्र संदर्भ (यशया: ५:३-५, स्त्रोत्र १०३:१-५, योहान १४-६)

**<u>आपले वाईट विचार व सवयी देवाची शक्ती व अधिकार यात टाकून द्या.</u>**

प्रिय देवा, मला माहित आहे कि तुझे आशीर्वाद व तुझी ईश्वरी कृपा माझ्यावर आहे. मी वाईट सवयींबरोबर झगडत आहे. जे तुझ्या डोळ्यात योग्यतेचे नाही. हे वाईट विचार व सवयी मला टाकून द्यायच्या आहेत. तू मला सापांवर व विंचवांवर जोराने पाय आपटून चालण्यासाठी अधिकार तसेच शत्रूवर सर्व शक्ती वापरण्यास ताकद दिलीस. त्यामुळे मला कशामुळेही दुखापत होणार नाही. म्हणून ख्रिस्ताच्या शक्तिशाली नामामध्ये मी या सर्व वाईट विचार व सवयींना आता या क्षणी सोडून जाण्याची आज्ञा करते. देवा कृपा करून तुझ्या मौल्यवान रक्ताने मला धुवून सर्व पापांपासून मला शुद्ध कर. तुझ्या ईश्वरी करुणेने मला भर. मी तुझी वाखाणणी करण्यासाठी व तुझ्या पवित्र नामाचा गौरव करण्यासाठी जिवंत राहीन. ख्रिस्ताच्या सामर्थ्यवान नावाने मागते. आमेन

शास्त्र संदर्भ: (लूक १०:१९)

**<u>शांती साठी प्रार्थना</u>**

देवा माझे अंतःकरण दुःखी आहे. मला मनःशांती नाही. मी माझे मन दुसऱ्या ठिकाणी वळविण्याचा प्रयत्न करते पण अस्वस्थ करणारे विचार मनात येतात. येशु राजा तुझ्या बालकांना तुझी शांती देवाचे आश्वासन तू दिले आहेस. तू म्हटले आहेस, माझी शांती मी तुम्हास देत आहे, जसे जग होते तसे मी तुम्हास देत नाही. तुमचे अंतःकरण अस्वस्थ अगर भयभीत होऊ नये. "तुझ्यावर विश्वास ठेवते, देवबाप्पा, मी तुझ्या अभिवचनांवर विश्वास ठेवते. तुझे आभार मानते देवा, माझ्यासाठी हजर राहण्यासाठी मी तुझ्या नामाची स्तुती करते. माझ्या सर्व चिंता तुला सोपविते कारण तू माझी काळजी घेतोस. मी विश्वास ठेवते कि तुझी शांती माझ्या बरोबर आहे. तुझी शांती हि माझ्या अंतःकरणात काम करीत आहे. तुझी शांती हि सर्व मानवजातीच्या आकलनापलीकडची आहे. आभारी आहे देवा.

देवा मला महित आहे कि जी लोक तुझ्यावर विश्वास ठेवतात व ज्यांचे विचार तुझ्याविषयी पक्के आहेत त्या लोकांना तू पूर्ण शांतीत ठेवशील. देवा मी तुझ्यावर विश्वास ठेवते. तू शाश्वत खडक आहेस व आमची अनंत काळची ताकद आहेस. मी शांतपणे आडवी होईन व झोपेन, तूच एकटा देवा मला सुरक्षित ठेवशील. तुझ्या सर्व बालकांसाठी मी प्रार्थना करते. ज्या ह्रदयात शांती नाही, तुझ्या शांतीचा स्पर्श त्या ह्र्दयांना व्हावा व त्यांना समाधान मिळावे. पित्या हि प्रार्थना सामर्थ्यशाली ख्रिस्ताच्या नावात मागते.

शास्त्र संदर्भ (योहान १४:२७, स्त्रोत्र ४:८
यशया २६:३-४, १ले पेत्र ५:७, फिलीपैकरांस पात्र ४:६-७)

**<u>आपल्या स्वतःच्या चुका व पापांसाठी देवाकडून क्षमा मिळण्यासाठी प्रार्थना</u>**

प्रेमळ स्वर्गीय पित्या, तुझ्या पवित्र सान्निध्यात येउन तुझ्या पायाशी बसण्याची परवानगी द्यावी. माझे विचार माझे शब्द व माझ्या कृतीतून जी पापे केलीत त्यासाठी तुझ्याकडून क्षमा याचना करीत आहे.

तुम्ही सर्व जी पापे व ज्या चुका केल्यात त्याच्या बद्दल क्षमा मागा

- *तुमच्या बालपणी*
- *तरुण प्रौढापणी*
- *तुमच्या कामाच्या ठिकाणी/ शाळेत/ कचेरीत*
- *तुमच्या घरातील लोकांशी असलेल्या नातेसंबंधात*

*- तुमचे नातेवाईक व मित्र मंडळींशी असलेल्या नात्यात*
*- तुमचे इतरांशी असलेल्या नाते संबंधात*
*तुमच्या आतापर्यंत केलेल्या सर्व चुका देवासमोर आणा व त्याच्याकडे क्षमेची याचना करा.*
देवा जी पापे मी केलीत ती अंतःकरणात दडून बसली आहेत- हे मला कसे कळेल? आपल्या स्वतःच्या चुका स्वतः कोण ओळखेल? कृपा करून माझ्या दडलेल्या चुकांना क्षमा कर. माझ्या दडलेल्या चुकांपासून मला स्वच्छ कर. जाणूनबुजून झालेल्या पापांपासून मला दूर ठेव. त्यांना माझ्यावर नियंत्रण ठेऊ देऊन नकोस. मग मी अपराधी पण व मोठ्या पापांपासून निष्पाप ठरून मोकळी होईन.
मी पापे केलीत आणि केवळ तुझ्या कृपेमुळे ती धुतली गेलीत आणि मी मान्य करते कि येशु ख्रिस्त माझा तारणारा आहे. माझी पापे व माझे आजार काढून टाकण्याठी तो या जगात आला. त्याची कृपा आणि त्याचे आमच्यासाठी क्रूसावरील मरण यामुळे मी तुला माझा पिता मानते.
देवा तू खूप शक्तिशाली व प्रेमळ आहेस. निन्वेह शहराला तू वाचवलेस व तिथल्या सर्व लोकांनी त्यांच्या पापांसाठी पश्चाताप केला तेव्हा तू त्यांची सुटका केलीस.
देवा तू खूप दयाळू व कनवाळू आहेस. राग येण्यास संथ आणि प्रेमळ व दयाळूपणात मुबलकता.
मला पवित्र कर. माझे हृदय आणि मन स्वछ कर. मी केलेल्या पापांची मला क्षमा कर. येशु ख्रिस्ताच्या मौल्यवान रक्ताने मला धु आणि पवित्र कर. मी तुला धन्यवाद देते व तुझ्या पवित्र आणि शक्तिशाली नामाची स्तुती करते. माझ्या मुखातून निघणारे शब्द व हृदयातून निघणारे चिंतन हे तुझ्या नजरेत स्वीकारण्याजोगे असावे. हे देवा तू माझे सामर्थ्य आहेस. तू मला सोडविणारा आहेस. कृपा करून मला क्षमा कर. आणि तुझी शांती, प्रेम व आनंद यांनी आशीर्वादित कर. माझ्या कुटुंबालाही आशीर्वाद पाठव.
पित्या येशूच्या पवित्र व शक्तिशाली नामाने मागते. आमेन

शास्त्र संदर्भ (स्त्रोत्र १९:१२-१४)

**<u>इतरांना क्षमा करण्यासाठी योग्य असण्यासाठीची प्रार्थना</u>**

प्रेमळ स्वर्गीय पित्या, मी दुखावलेली आहे. मला वाटते कि मी (ज्या व्यक्तीला क्षमा करणे कठीण आहे असे वाटते त्या व्यक्तीच्या नावाचा उल्लेख करा) क्षमा करू शकणार नाही. हा प्रसंग विसरणे मला कठीण जात आहे. परंतु देवा मला माहिती आहे कि मी क्षमा न करण्याची इच्छा मनात घेऊन असावे असे तुला वाटत नाही. मला तुझ्याकडून खूप शिकण्यासारखे आहे. तू आपला एकुलता एक पुत्र येशु ख्रिस्त या जगात माझ्यासाठी क्रुसावर मरण पावण्यासाठी,माझे पाप व आजार काढून घेण्यासाठी पाठवलास. त्याच्या मौल्यवान रक्तामध्ये माझ्या पापांची क्षमा झालीय. व माझी पापे सर्वकाळासाठी धुवून गेलीयेत. आणि पित्या तू म्हणालास कि तू माझी मागची पापे कधीच आठवणार नाहीस.

शास्त्र संदर्भ :- ( इफिसकरांस ४:१२, इब्री लोकांस पत्र १७:१७)

**<u>भीतीवर मात करण्यासाठी प्रार्थना</u>**

प्रेमळ स्वर्गीय पित्या, तुझे पवित्र नाम एक भक्कम मनोरा आहे. मी तुझ्याकडे धावत येते आणि मी सुरक्षित आहे. तू माझा अधिपती माझा देवा आहेस. तू इम्यनुएल आहेस. देव आम्हाबरोबर आहे. जो माझ्यामध्ये आहे तो जगामध्ये आहे त्याच्या पेक्षा श्रेष्ठ आहे. मला कसलीही भीती नाही.

देवा मी तुझे मुल आहे. आणि मला पवित्र आत्मा चालवितो. मला कशाचीही भीती वाटण्यासारखे नाही. पवित्र आत्मा माझ्या आत्म्याशी जोडला जातो. व खात्रीपूर्वक सांगतो कि मी तुझे मुल आहे.

देवा तू प्रमुख आहे व प्रत्येक गोष्टीवर नियंत्रण ठेवतोस. मला दुसऱ्या कशाचीही भीती वाटत नाही कारण तू माझा अब्बा बाप आहेस.

देवपित्या आभारी आहे. कृपा करून सतत मला तुझ्या शांतीबरोबर आशीर्वाद दे. आणि पित्या मी इतरांसाठी ज्यांना भीती घालविण्यासाठी तुझी माय व कृपा यांची गरज आहे , प्रार्थना करते. आमेन

शास्त्र संदर्भ:- नितीसुत्रे १८:१०, १ले योहान ४:४ रोम १४-१६

**<u>देवामध्ये आशा आणि विश्वास या साठी प्रार्थना</u>**

देवा, मी तुझ्याकडे प्रार्थनेच्या हेतूने आलेले आहे. मला माहिती आहे कि तू माझ्या प्रार्थना ऐकतोस. देवा, काही वेळेस जेव्हा मी खूप अशक्त असते आणि माझ्या मनात शंका असतात. काही क्षण असे असतात कि माझा विश्वास खूप अशक्त असतो, तेव्हा त्यासाठी मला क्षमा कर. माझ्या अविश्वासासाठी मला क्षमा कर.

देवाचे वचन ऐकून विश्वास येतो. मला आशीर्वाद दे कि माझा जास्त वेळ मी शास्त्रावाचनात घालवावा. जो तुझा पवित्र शब्द आहे. कृपा करून माझा विश्वास वाढव. विश्वास हाच आत्मविश्वास आहे ज्याची आम्ही आशा करतो. जे नक्की घडणार आहे ज्या गोष्टी आपण पाहू शकणार नाही त्याची खात्री तो देतो. मला आशीर्वाद दे ज्याने माझा तुझ्यामधील विश्वास वाढेल.

मला माहित आहे कि तू आमचा प्रेमळ देव आहेस. आमच्या सर्व प्रश्नांची उत्तरे तू देतोस. ज्या गोष्टींसाठी मी प्रार्थना करतो त्या माझ्यासाठी योग्य नसतील तर कृपा करून माझ्यासाठी जे सर्वात चांगले असेल ते देऊन मला आशीर्वादित कर.

पवित्र देवा, तू वचन दिले आहेस कि तू माझ्यासाठी मोठ्या योजना केलेल्या आहेस. शांतीची योजना जी मला उज्वल भवितव्य आणि अशा देईल. मला विश्वास आहे कि तू माझ्यासाठी जी योजना योजिली आहेस ती आत्तापर्यंत सर्वात उत्तम अशी आहे. मी तुझ्याबरोबर आज्ञाकारी असण्यास मला शिकव.तू आशेचा देव आहेस. मी प्रार्थना करते कि तू मला संपूर्णपणे तुझा आनंद व शांती यांनी भरून टाक. कारण मी तुझ्यावर विश्वास ठेवते. मग मी आत्मविश्वासाने आशेने तुझ्या पवित्र आत्म्याच्या शक्तीने पूर्णपणे भरून वाहीन.

मी दुसऱ्या लोकांसाठी सुद्धा प्रार्थना करते जे त्यांच्या विश्वासात आटोकाट प्रयत्न करतात व ज्यांना तुझ्यामध्ये असलेल्या आशेच्या प्रकाशाचा अनुभव मिळण्याची गरज आहे.देवा
पित्या, ख्रिस्ताच्या नामात हि प्रार्थना करते. आमेन

शास्त्र संदर्भ:- (रोमकरांस पत्र १०:१७, यिर्मया २९.१०, रोम १५:१३, इब्री. लोकांस पत्र ११.१)

**<u>प्रेमासाठी प्रार्थना. ख्रिस्ताच्या प्रेमाने दुष्टाई वर विजय मिळविणे.</u>**

प्रेमळ स्वर्गीय पित्या, आम्ही तुझ्याकडे प्रार्थनेत असे लोक आणतो ज्यांनी आमच्या कुटुंबाशी दुष्टपणे वागून आम्हाला इजा पोचवण्याचा जाणून बुजून किंवा नकळत प्रयत्न केला आहे. पित्या, तू आम्हाला सूचना दिली आहेस कि आम्ही इतरांना क्षमा करावी. म्हणून आम्ही या लोकांपैकी प्रत्येकाला क्षमा करतो. व शांतीसाठी आणि या लोकांच्या उत्कर्षासाठी प्रार्थना करतो. तुझी कृपा, शांती व करुन यांनी आशीर्वादित कर.
देवबाप्पा, तू म्हटले आहेस,'मी तर तुम्हास सांगतो तुम्ही आपल्या वैऱ्यावर प्रीती करा आणि जे तुमचा छळ करतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा. म्हणजे तुम्ही आपल्या स्वर्गातील पित्याचे पुत्र व्हाल. कारण तो वाईटांवर व चांगल्यावर आपला सुर्य उगवितो. आणि धर्मिकांवर व अधर्मिकांवरही पाऊस पाडितो.
देवा आम्ही तुझे आज्ञाधारक आहोत. आणि आम्ही सर्व लोकांसाठी प्रार्थना करतो कि तू त्यांना तुझे प्रेम शांती व आनंद यांनी आशीर्वादित कर. त्यांनी तुला ओळखावे आणि एका विशिष्ठ रीतीने अनुभवावे.
पित्या, मी ख्रिस्ताच्या सामर्थ्यवान नावाने मागते. आमेन

शास्त्र संदर्भ : (मत्तय ५:४४-४५)

**<u>शरण जाण्यासाठी - स्वाधीन होण्यासाठी प्रार्थना.</u>**
**<u>देवाला माझ्या जीवनाची जबाबदारी घेण्यास परवानगी देणे.</u>**

देवा तू म्हटले आहेस ' मागा म्हणजे तुम्हास दिले जाइल, शोध म्हणजे सापडेल, ठोका म्हणजे तुम्हास उघडले जाइल." इथे मी आहे देवा मी तुला विनंती करते कि तू माझ्या जीवनात ये. मी तुझी इच्छा शोधत आहे. हे देवा, माझे जीवन मी तुला समर्पित करीत आहे. देवा माझ्या जीवनात तुला अग्रस्थान देत आहे. कृपा करून माझ्या जीवनाची जबाबदारी व अधिकार तू घे कारण मला ठाऊक आहे कि तुझी माझ्यासाठीची योजना आत्ता पर्यंत शक्य असलेल्या योजनेपेक्षा सर्वश्रेष्ठ आहे.
मला मीहिती आहे कि तू आमचा प्रेमळ पिता आहेस, जो आमच्या प्रार्थनेला उत्तर देतो. जर मी ज्या गोष्टीसाठी प्रार्थना करते ती माझ्यासाठी चांगली नसेल तर माझ्यासाठी जे सर्वात चांगले आहे ते देऊन आशीर्वादित कर. पवित्र पित्या तू वचन दिले आहेस कि तू माझ्यासाठी मोठ्या योजना केल्या आहेस. शांतीची योजना जी मला उज्वल भविष्य व आशा देईल, मला विश्वास आहे कि तू माझ्यासाठी जी योजना योजली आहेस ती आतापर्यंत सर्वात उत्तम अशी आहे कारण जसे आकाश पृथ्वीपेक्षा उंच आहे तसे तुझे मार्ग  माझ्या मार्गाहून आणि तुझ्या कल्पना माझ्या कल्पनांहून उंच आहेत.
परमेश्वरा, तुझा मार्ग मला दाखव. मी तुझ्या सत्यामार्गात चालेन. (तुझ्या नामाचे भय धरण्यास माझे चित्त एकाग्र कर) मला हृदयाची शुद्धता दे म्हणजे मी तुझा आदर करेन.
पित्या, ख्रिस्ताच्या शक्तिशाली नामाने मागते. आमेन

शास्त्र संदर्भ (मत्तय ७:७, स्त्रोत्र ८६:११, यिर्मया २९.११, लुक १:३, याशी ५५:१)